
मदर तेरेसा

कैंडिस रैनसम

चित्र : ऐलेन वेरस्ट्रेट

मराठी : अश्विनी बर्वे



मदर तेरेसा





स्कोप्जे, अल्बानिया १९१९

जेव्हा मदर तेरेसा एक मुलगी होत्या, तेव्हा त्यांचे नाव एग्नेस बोजाक्सीहु होते. एग्नेसला बाजाराचा दिवस आवडत असे, ती बाजारात आपली आई डानाच्या मागे-मागे जात असे.



बाजारात फळं-भाज्यांचे उंच ढीग लावलेले होते. दगडांच्या रस्त्यावर मातीची भांडी लावलेली होती. एग्नेस आपल्या आईला खरेदी करतांना पाहत असे, डाना एकही पैसा वाया घालवत नसे.

हे वर्ष कठिण होते. एग्नेसच्या वडिलांचा मृत्यू झाला होता. नऊ वर्षाच्या एग्नेसला वडिलांची खूप आठवण येई. वडील तिला “फुल-कळी” म्हणत. तिची बहीण ऐज, आणि भाऊ लजारला पण वडिलांची खूप आठवण येत असे.

एग्नेसचे वडील एक श्रीमंत व्यापारी होते.

वडिलांशिवाय, बोजाक्सीहु परिवार गरीब झाला होता.

मग आई ड्रानाने, एक दुकान सुरु केलं. ती कपड्यांवर भरतकाम करत असे आणि ते विकत असे.

ती सणांसाठी लागणारे विशेष कपडे आणि लग्नाचे कपडे सुद्धा शिवत असे..



घराच्या दरवाज्यावर थाप पडली.एक गरीब महिला बाहेर उभी होती..

ड्रानाने महिलेला त्यांच्याबरोबर रात्रीचे जेवण घेण्यासाठी आत बोलावले.




मग ती महिला एग्नेस, ऐज, लजार, आणि आई बरोबर टेबलवर बसून जेवली..

एग्नेसला वाटलं की ती महिला कोणी नातेवाईक आहे.

पण ती एक अनोळखी व्यक्ती होती.

ड्रानाने एग्नेसला म्हटलं की भुकेल्या अनोळखी लोकांना नेहमी मदत करायला हवी.



जेव्हा एक शेजारी महिला आजारी पडली, तेव्हा एग्नेस आणि तिच्या आईने त्या महिलेची काळजी घेतली.

त्यांनी दिवसातून दोन वेळा तिला अंघोळ घातली आणि जेवायला घातले..

त्यांनी एक विधवा जिची सहा मुलं होती त्यांना पण मदत केली.

जेव्हा ड्रानाला काम करायचे असे, तेव्हा एग्नेस स्वतः एकटी जात असे.

आपल्या आईसारखीच एग्नेसपण दुसऱ्यांना मदत करण्यावर विश्वास ठेवत असे.





स्कोप्जे, अल्बानिया १९२२

बारा वर्षीची एग्नेस आनंदाने डोलत गायली.

तिला चर्चच्या संगीत समूहात गायला आवडत होते.यावरून लिजार तिला चिडवत असे.

आता एग्नेस घराच्या तुलनेत सेक्रेड हार्ट चर्चमध्ये अधिक वेळ घालवत असे.



एग्नेस सेक्रेड हार्ट शाळेत शिकायला गेली. लज़ार आणि ऐज पण तिथं शिकत होते. एग्नेस एक शांत विद्यार्थिनी होती. एग्नेसला आपल्या आई बरोबर चर्च मध्ये काम करायला आवडे.

ती सणाच्या दिवशी फुलं आणत असे. ती प्रत्येक पर्वासाठी बॅनर आणि झेंडा लावत असे.

एग्नेस आनंदी राहत असे, पण तिची तब्येत नेहमी बरी नसायची.

तिला नेहमी खोकला आणि ताप येत असे.

हिवाळा तिच्या स्वास्थासाठी चांगला नव्हता.

म्हणून उन्हाळ्यात तिचे कुटुंब डोंगरावर जात असे.डोंगरावरची ताजी हवा आणि स्वच्छ झरे तिच्यासाठी चांगले होते.

डोंगरावर, एग्नेस लोरेटोच्या मॅडोनाच्या चर्चमध्ये प्रार्थना करत असे.

तिथं ती आणि ऐज मिळून लांबवर फिरायला जात असत.

रात्री ते शेकोटीजवळ बसून गोष्टी ऐकत असत.

या प्रवासात एग्नेस सगळ्यात जास्त खुश असे.



जेव्हा उन्हाळ्यात एग्नेस १२ वर्षाची झाली तेव्हा काहीतरी झालं.

एग्नेस, मडोनाच्या मूर्तीजवळ गेली.तिने मेणबत्ती पेटवली आणि प्रार्थना केली. जेव्हा ती प्रार्थना करत होती तेव्हा एक आवाज तिला ऐकू आला.

आवाजाने तिला देवाचा मार्ग अनुसरायला आणि दुसऱ्याची सेवा करायला सांगितले.

देव स्वतः तिच्याशी बोलला.

मग एग्नेसला आपल्या जीवनाचे काय करायचे हे कळलं.

ती गरिबांना मदत करेल..

ती आपले जीवन चर्चला समर्पित करेल आणि एक नन होईल.





कलकत्ता, भारत १९३१

सिस्टर तेरेसा आपल्या वर्गात उभ्या होत्या. आता त्यांचं नाव एग्नेस नव्हते.

वर्षानुवर्षे त्यांनी नन होण्याचे प्रशिक्षण घेतले होते.

त्या वसंतात, त्यांनी आपली पहिली प्रतिज्ञा घेतली होती.

त्यांनी खूप गोष्टींचा त्याग करण्याचे ठरवले होते.

त्यांनी कॉन्वेंटच्या दाराआड राहून काम करायला हवे होते. त्या खूप साऱ्या गोष्टी करू शकत नव्हत्या.त्या लग्न करू शकत नव्हत्या..

जेव्हा एग्नेस नन झाल्या. तेव्हा त्यांनी एक नाव घेतले. त्यांनी स्वतःसाठी सेंट तेरेसाचे नाव निवडले. त्या दिवसापासून त्या सिस्टर तेरेसा झाल्या.

सिस्टर तेरेसा, लोरेटो कॉन्वेंट शाळेत शिकवतांना खूप खुश होत्या. त्यांनी खिड़कीच्या बाहेर लांबलचक हिरव्या लॉन कडे पाहिले. तिथं सगळं काही शांत होते.खाण्यासाठी खूप काही होतं. पण लोरेटोच्या भिंतीच्या बाहेरचे जीवन शांतिपूर्ण नव्हते.

लोरेटो कॉन्वेंट कलकत्तात होते, ज्याला "महालांचे शहर" म्हटले जात असे.


कलकत्तात चकित करणाऱ्या जागा पण होत्या.

तिथं झोपडपट्टीतली गर्दी, घाणेरड्या जागा होत्या.

या घाणेरड्या वस्तीत गरीब लोक राहत होते.मुलं फाटके कपडे घालत आणि कचऱ्यात खाणं शोधत..

सिस्टर तेरेसा एका गरीब देशाची नन झाल्या होत्या.

त्यांनी देवाच्या आव्हानाचे पालन केले.पण काहीतरी गायब होते.



सहा वर्षानंतर, सिस्टर तेरेसाने आपली अंतिम प्रतिज्ञा घेतली.

त्यांनी गरीब राहण्याचा निर्णय घेतला.त्यांनी परमेश्वराने दिलेली आज्ञा पाळण्याचे व्रत घेतले.

त्यानंतर लगेचच, त्या लोरेटो स्कूलच्या प्रिन्सिपल झाल्या.

त्यांन जवळजवळ ३०० मुलींची देखभाल करायची होती.


जेव्हा भारतात युद्ध सुरु झाले, तेव्हा, सिस्टर तेरेसा काळजीत पडल्या. अन्नाची खूप कमतरता होती. गल्ली गल्लीत गोळ्यांचे आवाज घुमायला लागले.

टँकाचा गडगडाट झाला.

दंग्यापासून वाचण्यासाठी लोक कॉन्वेंटच्या भिंतीवर चढले.

सिस्टर तेरेसाने त्यांना मदत केली.





लोरेटोमध्ये साधारणपणे जेवण एका ट्रक द्वारे येत असे. पण ट्रक सुद्धा दंग्यामधून सुटल्या नाहीत. शाळेत अन्न नव्हतं. अनेक वर्षानंतर सिस्टर तेरेसा लोरेटोच्या चार भिंतीच्या बाहेर आली. त्यांनी जिकडे पाहिले तिकडे जखमी नाहीतर मृत लोक दिसले. त्यांनी रस्त्यावर राहणाऱ्या गरीब लोक पाहिले. तेव्हा त्यांना तांदूळ भरलेल्या गोण्या घेवून जाणारी एक जिप दिसली. एक शिपाई त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करत होता. पण शेवटी सिस्टर तेरेसाला तांदूळ मिळाले.

लोरेटो मध्ये सुरक्षित परत आल्यानंतर सुद्धा त्या चार भिंतीच्या बाहेरची परिस्थिती विसरू शकत नव्हत्या.

पूर्व भारत, १० सप्टेंबर १९४६

एक महिन्यानंतर, सिस्टर तेरेसा एका ट्रेनमध्ये बसल्या.

त्या कलकत्त्याची उष्णता आणि झोपडपट्टी पासून दूर पहाडावर जात होत्या.

ताजी हवा त्यांना थोडा आराम देईल. ट्रेनच्या चाकांचा धाड धाड आवाज येत होता.

सिस्टर तेरेसाने प्रार्थना केली, ट्रेनच्या चाकांच्या आवाजापेक्षा एक वेगळा आवाज त्यांना ऐकू आला. देव त्यांना लोरेटो सोडायला सांगत होता. देवाची इच्छा होती की त्यांनी झोपडपट्टीत जावून सेवा करावी. त्याला वाटत होते की सिस्टरने गरिबांची सेवा करावी.

.



सिस्टर तेरेसा हैराण झाली..

त्यांना वाटत नव्हते की देव त्यांच्याशी परत बोलेल.

पण त्यांना माहित होते की त्यांना साध्या गरिबांबरोबर काम करण्याची गरज आहे. ते काम त्यांनी पहिले कधी केले नव्हते.

कलकत्ताला परत आल्यानंतर सिस्टर तेरेसाने कॉन्वेंट सोडण्याची तयारी केली.

त्यांना ते काम सोडणं अवघड होते.

सिस्टर तेरेसाने त्या कॉन्वेंट मध्ये 20 वर्ष काम केलं होतं. त्यांना तिथं शिकवणं आवडत होतं. पण त्यांना देवाच्या आज्ञेचे पालन करायचे होते.





सिस्टर तेरेसाने केवळ काही पैशांनिशी, लोरेटो

च्या सुरक्षित भिंती सोडल्या..

ननचा यूनिफार्म आता त्यांच्यासाठी खूप गरम होता म्हणून त्यांनी एक साडी खरेदी केली, जो भारतीय महिलांचा पोषाख होता.ती सुती कपड्याची होती आणि त्यावर तीन निळ्या रेघा होत्या. त्यांनी साडी आपल्या चारी बाजूला लपेटून घेतली आणि आपल्या डाव्या खांद्यावर एक क्रॉसची पिन लावली.

सिस्टर तेरेसाला वैद्यकीय प्रशिक्षण घेण्याची गरज होती. रस्त्यावर अनेक लोक आजारी होते. त्या लोकांना तपासण्याची खूप गरज होती.

म्हणून सिस्टर तेरेसा त्या नन्सजवळ गेली ज्यांना चिकित्सा करणं येत होतं. त्या प्राथमिक उपचार करायला शिकल्या. त्यांनी ऑपरेशन करतांना पाहिलं. त्यांनी बाळंतपणासाठी गर्भवती मातांना मदत केली.. सिस्ट तेरेसाने नर्सना सांगितलं की त्यांना सगळ्यात गरीबातल्या गरीब लोकांची देखभाल करायची आहे.आता त्या गरिबांबरोबर राहील.त्या गरिबांचे खाणं खाईल –फक्त भात. पण एका नन ने सिस्टर तेरेसा यांना स्वतः स्वस्थ राहण्याचा सल्ला दिला. त्यांनी नीट खाल्लं पाहिजे, आराम केला पाहिजे आणि स्वच्छ राहिलं पाहिजे. तेव्हाच त्यांच्याजवळ गरिबांना मदत करण्याची ताकद आणि उर्जा येईल.

सिस्टर तेरेसाला त्या ननचे म्हणणे पटले.





कलकत्ता, भारत, १९४८


लोरेटो शाळेच्या जवळ मोती झील नावाची एक झोपडपट्टी होती. पण झोपडपट्टी आपल्या नावासारखी सुंदर नव्हती.तिथले लोक मातीची जमीन असणाऱ्या झोपडीत राहत होते. लोक घाणेरड्या तलावाचे पाणी पीत आणि तिथंच अंघोळ करत होते.

सफेद साड़ीत छोटी नन त्या घाणेरड्या वस्तीत गेली. तिथं सगळ्यात आधी तिने काय करायला पाहिजे?

सिस्टर तेरेसा एक शिक्षिका होत्या. म्हणून त्यांनी सगळ्यात आधी एक शाळा सुरु केली. सिस्टर तेरेसाने एका झाडाखाली मुलांना एकत्र केलं. त्यांनी एका काठीने मातीत अक्षरं लिहिली.मग दुसऱ्या दिवशी, कोणीतरी एक खुर्ची आणून दिली. मग कोणीतरी टेबल आणलं. लवकरच अनेक मुलं सिस्टर तेरेसाच्या उघड्या शाळेत शिकायला आले.







सिस्टर तेरेसा रोज झोपडपट्टीत जात असे. त्यांना विश्वास होता की लोक त्यांना जरूर मदत करतील.एक दिवस, त्यांना गरिबांसाठी औषधाची गरज पडली. मग सिस्टर तेरेसा एका औषधांच्या दुकानात गेल्या. दुकानदाराने मोफत औषध देण्यास नकार दिला.


सिस्टर तेरेसा पूर्ण दिवसभर त्याच्या दुकानासमोर बसून राहिल्या. दुकान बंद होण्याच्या वेळेस विक्रेत्याने त्यांच्या यादीतले सगळे काही दिले. लवकरच त्यांचे दोन जुने विद्यार्थी त्यांच्याशी जोडले गेले. त्यांनी आपल्या शाळेसाठी एक झोपडी भाड्याने घेतली. सिस्टर तेरेसाने आपला स्वतःचा समूह ,नन्सचा समूह सुरु केला.

त्याला मिशनरीज ऑफ चैरिटी म्हटलं गेलं. आपल्या समूहाच्या प्रमुख रुपात त्या आता मदर तेरेसा झाल्या.


१९५३मध्ये मदर तेरेसा आणि त्यांच्या नन्स एका मोठ्या घरात राह्यला गेल्या. त्यांनी त्याला "मदर हाउस" म्हटलं. सगळ्या सिस्टर्स सकाळी ४.४५ ला उठत असत. मग त्या घर स्वच्छ करत. सकाळी आठ ते साडे बारा पर्यंत

सिस्टर्स खराब वस्तीत काम करत. त्या दुपारी जेवण आणि आरामासाठी मदर हाउस मध्ये परत येत. मग त्या परत जात आणि संध्याकाळी ७.३० पर्यंत काम करत. रात्री झोपण्यापूर्वी त्या जेवत आणि प्रार्थना करत. त्यांचा दिवस कामाने भरलेला व्यग्र होता.

मदर तेरेसाने पण दिवसभर काम करत, पण त्या रात्री सुद्धा खूप वेळ काम करत.



एक दिवस मदर तेरेसाला गटारीत पडलेली एक मृत स्त्री सापडली. मदर तिला घेवून दवाखान्यात गेल्या. पण दवाखान्यात तिला दाखल करून घेतले नाही. मरणाऱ्या लोकांची संख्या खूप आहे,असे दवाखान्यावाल्यांनी सांगितलं.



झोपड़पट्टीतल्या मुलांकडे शाळा होती पण आजारी लोक अजूनही रस्त्यावर मरत होते. मरणाऱ्याना प्रेम आणि काळजी करणारे कोणी का नव्हते? म्हणून मदर तेरेसा यांनी "निर्मल हृदय" नावाचे घर सुरु केले. आता लोक एकटे मरणार नाही, त्यांची कोणी काळजी घेईल.



त्यांचा दिवस मोठा होता. पण मदर तेरेसाच्या जवळ नेहमी आजारी लोकांची सेवा सुश्रुषा करण्यासाठी वेळ होता. त्यांच्याजवळ अजून एक प्रार्थनेसाठी वेळ होता. त्यांचे मुलं आणि मोठी माणसं यांच्यावर प्रेम होतं.त्यांना आजारी लोक आणि मरणारे लोक यांच्याविषयी प्रेम होते. त्या सगळ्या गरीब लोकांवर प्रेम करत होत्या. मदर तेरेसा तिच्यासारखीच एक अनोखी व्यक्ती होती. त्यांच्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे महत्व होते.



शेवटचे शब्द

१९७९मध्ये मदर तेरेसा यांना नोबेल शांती पुरस्कार मिळाला. मदर तेरेसाने आपली साधारण साड़ी नेसून गरीबांच्या हितासाठी तो पुरस्कार स्वीकारला. त्यांनी त्यांच्या सन्मानासाठी आयोजित जेवणाच्या कार्यक्रमाला नकार दिला. ते पैसे त्यांनी मिशनरीज ऑफ चैरिटीला पाठवण्याची शिफारस केली.

जसजशी त्यांची प्रसिद्धी वाढली,तसतसे त्यांचे प्रकल्प वाढत गेले. त्यांनी जगभर मिशनरीज ऑफ चैरिटी हाउस उघडले.

१९९७ला सप्टेंबर मध्ये एका संध्याकाळी मदर हाउसची घंटा वाजली. हजारों उदास लोक तिथं जमले होते. ८७वर्षाच्या मदर तेरेसा यांचे निधन झाले होते.

त्यांचे काम चालू आहे. १२६देशांमध्ये मिशनरीज ऑफ चैरिटी हाउस मध्ये ४५०० पेक्षा अधिक कार्यकर्ता काम करत आहेत.गरीब आणि आजारी लोकांजवळ नेहमी मदत आणि काळजी करणारे लोक असतात.



महत्वपूर्ण तिथी

१९१०-२६ ऑगस्ट, एग्नेस बोजाक्सीहुचा जन्म स्कोप्जे, अल्बानियात झाला.

१९१९ – एग्नेसच्या वडिलांचे निधन.

१९२२- एग्नेसला परमेश्वरची पहिली आज्ञा आली.

१९२८ - एग्नेस ऑर्डर ऑफ द सिस्टर्स ऑफ लोरेटो मध्ये सामील होण्यासाठी आयर्लंडला गेली.

१९२९- एग्नेस भारतात कलकत्त्याला आली.

१९८१- एग्नेसने नन च्या रुपात आपली प्रतिज्ञा घेतली आणि सिस्टर तेरेसा नाव घेतलं.

1१९३७- सिस्टर तेरेसाने आपली अंतिम प्रतिज्ञा घेतली.

१९४६ - सिस्टर तेरेसाला परमेश्वराचे दुसरी आज्ञा आली.

१९४८ - सिस्टर तेरेसाने लोरेटो कॉन्वेंट सोडलं.

१९५० - मिशनरीज ऑफ चैरिटीची स्थापना झाली आणि सिस्टर तेरेसा झाली मदर टेरेसा,

१९५२ - मदर तेरेसाने "निर्मल हृदय" ची स्थापना केली.

१९७९- मदर तेरेसाला नोबेल शांती पुरस्काराने सम्मानित केलं गेलं.

१९९७ - ६ सप्टेंबर, मदर तेरेसाचे कलकत्ताच्या मदर हाउस मध्ये निधन.

समाप्त